# प्रेस नोट दि. २१/०७/२०१७

## निगडी पोलीस स्टेशन कडील तपासपथकाची कामगीरी

## गावठी बनावटीचे १ पिस्टल,१ रिव्हॉल्व्हर व जिवंत राऊंड बाळगणा-या स-हाईत गुन्हेगारांना केली अटक

निगडी पोलीस स्टेशनचे हद्दीत दिवसेंदिवस वाहन चोरीचे व घरफोडीचे प्रमाण वाढल्याने निगडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विजयकुमार पळसुले व पोलीस निरीक्षक गुन्हे श्री. शंकर आवताडे यांनी अधिकारी व कर्मचारी यांना वाहन व घरफोडी चोरीचे गुन्हयांना आळा बसावा या करीता ॲक्शन प्लॅन तयार करुन कर्मचा-यांची दोन स्वतंत्र टिम तयार करुन त्यांना खब-या मार्फत माहिती काढण्यास वेळोवेळी सुचना देवुन मार्गदर्शन केले आहे.

दि.२१/०७/२०१७६ रोजी निगडी पोलीस स्टेशन कडील डी.बी. पथकातील कर्मचारी संदीप पाटील यांना त्यांच्या खास बातमीदाराकडुन बातमी मिळाली की रेकॉर्डवरील स-हाईत गुन्हेगार सम्या उर्फ समीर लहु सरोदे व त्याचा साथीदार किरण लाला कांबळे हे दोघे अंकुश चौक येथे थांबलेले असुन त्यांचेजवळ पिस्टल आहेत अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने सदरची बातमी मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विजयकुमार पळसुले साो व पो.नि.गुन्हे श्री. शंकर आवताडे साो,यांना कळवुन त्याच्या मार्गदर्शन व सुचनेनुसार आम्ही अंकुश चौक ओटास्किम निगडी पुणे येथे स.पो.नि.देवेंद्र चव्हाण,पो.हवा.किशोर पढेर,पो.ना. संदीप पाटील,पो.ना विलास केकाण,प्रसाद कलाटे यांनी सापळा लावला असता ०१.०० वा. चे सुमा. निगडी पोलीस स्टेशन कडील स-हाईत गुन्हेगार नामे सम्या उर्फ समीर लहु सरोदे व त्याचा साथीदार किरण लाला कांबळे हे सदर ठिकाणी उभे असताना दिसले. त्यांची नजरानजर होताच ते पळुन जावु लागताच त्यांना चारही बाजुने घेराव घालुन त्यांना जागीच शिताफिने पकडले. त्यांस आहे त्या स्थितीत ठेवुन त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव १)समिर उर्फ सम्या लहु सरोदे वय २३ वर्ष रा. बी/१४,दुसरा मजला घर नं.२०३,राजहंस सोसा. अंकुश चौक ओटास्किम निगडी पुणे २) किरण उर्फ धन्या लाला कांबळे वय ३० वर्ष रा. पवन पान भांडार समोर संजयनगर ओटास्किम निगडी पुणे असे सांगितले त्यांचेकडुन किं.रु. ८५,१००/-एक लोखंडी गावठी पिस्टल व लोखंडी गावठी रिव्हॉल्व्हर व जीवंत राउंड असा माल मिळुन आला. सदरचे आरोपी हे स-हाईत गुन्हेगार असुन त्याचेवर मारहाण,जीवे मारण्याचा प्रयत्न व खंडणी या सारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत.पुढील तपास देवेंद्र चव्हाण सहा.पोलीस निरीक्षक निगडी हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा. श्री. शशीकांत शिंदे अप्पर पोलीस आयुक्त साो,उत्तर प्रादेशिक विभाग पुणे,मा. श्री.गणेश शिंदे साो, पोलीस उपआयुक्त परि. ३ पुणे व श्री राम मांडूरके साो, सहा.पोलीस आयुक्त पिंपरी विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली निगडी पोलीस स्टेशनकडील मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक साो श्री. विजयकुमार पळसुले मा. पोलीस निरीक्षक साो (गुन्हे), श्री. शंकर आवताडे सहा. पोलीस निरीक्षक देवेंद्र चव्हाण व कर्मचारी किशोर पढेर,संदीप पाटील,विलास केकाण,प्रसाद कलाटे यांनी केली आहे.